जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
2 8 NOV 2023
पुढारी

# विद्यापीठातील योग, निसर्गोपचार शिबिरास ज्येष्ठ नागरिकांचा प्रतिसाद

कोल्हापूर : शिवाजी विद्यापीठातील आजीवन अध्ययन व विस्तार विभागात ज्येष्ठ नागरिकांच्या निरोगी व निरामय आयुष्यासाठी योग व निसर्गोपचार शिबिर झाले. यास ज्येष्ठ नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. 'फेसकॉम'चे समन्वय समितीचे जिल्हाध्यक्ष दिलीप पेटकर, सचिव श्रीकांत अडिवरेकर प्रमुख उपस्थित होते. अध्यक्षस्थानी विभागाचे संचालक डॉ. रामचंद्र पवार उपस्थित होते. शिबिरामध्ये ज्येष्ठ नागरिकांच्या विविध आरोग्य समस्यांवर चर्चा झाली. योग आणि निसर्गोपचारांमधून विनाऔषधी उपचार कसे केले जातात, याबद्दल अॅक्युप्रेशर तज्ज्ञ अरविंद पालके यांनी मार्गदर्शन केले. यावेळी टी.आर. गुरव यांनी मनोगत व्यक्त केले. रवींद्र खैरे यांनी सूत्रसंचालन केले. सहायक प्रा. यशोधन बोकील यांनी आभार मानले. यावेळी, वसंत सिंघण, आर.एम. जाधव, उदय घाटे, सुधाकर भोसले, मंगल पाटील, डॉ. श्वेतलीना पाटील उपस्थित होते.